# १. नागरी संरक्षण

**उद्दिष्टे**

(१) नैसर्गिक दुर्घटनांना अप्रत्यक्षपणे मानव जबाबदार आहे, ही जाणीव निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

(२) विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सामाजिक कर्तव्यभावना निर्माण करणे.

(३) स्वतःच्या क्षमता, मर्यादा, आकांक्षा ओळखून, महत्त्वाचे निर्णय घेता येणे, समस्यांचे निराकरण करता येणे अशा क्षमता वाढवणे.

नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींमुळे हवालदिल न होता त्यांच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी नागरिकांनी संघटितपणे केलेल्या प्रयत्नांना व सुव्यवस्थेला 'नागरी संरक्षण' असे म्हणतात. नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तीवर मात करण्यासाठी, त्यांच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी नागरिकांनी संघटित होऊन केलेल्या सुव्यवस्थेला 'नागरी संरक्षण' म्हणतात. समाजातील जागरूक नागरिक आपले कर्तव्य बजावत असतात.

## आवश्यकता

- नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींमुळे मानवाला सतत सावध राहणे गरजेचे आहे. देशाचे संरक्षण ही शासनाची, पर्यायाने नागरिकांची जबाबदारी आहे. देशाच्या विकासाला पोषक वातावरण तयार करण्यासाठी सर्वांनी यात सहभागी होणे आवश्यक आहे.
- परकीय आक्रमणामुळे देशातील नागरी जीवन उद्ध्वस्त होते. गावागावांतील संपर्क तुटतो. अशा वेळी तेथील जनतेचे मनोधैर्य वाढवणे गरजेचे असते. लोकांच्या सहकार्यावरच देशाचे सामर्थ्य अवलंबून असते.
- प्रत्येकाने नागरी संरक्षणाचे प्रशिक्षण घेतले तर आपत्कालीन परिस्थितीत ते देशाच्या संरक्षणाचे कार्य हाती घेऊ शकतात.
- आपत्तीच्या काळात काळाबाजार, साठेबाजी, लूटमार इत्यादी. अपप्रवृत्तींना वेळीच नष्ट करण्यासाठी नागरिकांनी सावधानता बाळगावी. या बाबतीत प्राथमिक माहिती मिळाली तर या आपत्तींवर राष्ट्र मात करू शकते.
- भाषिक, प्रादेशिक व धार्मिक विविधतेने नटलेल्या आपल्या देशाची अस्मिता जपताना देशाच्या एकजुटीला हानी पोहोचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. यासाठी नागरी संरक्षण गरजेचे ठरते.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देऊन आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन केली जाते.
- आधुनिक काळामध्ये जबाबदार नागरिकत्वासाठी जागतिक शांतता, मानवाचे हक्क, शांततामय सहजीवन,

सुरक्षित संवर्धन, धर्मनिरपेक्षता, समाजाचा विकास, पर्यावरण रक्षण इत्यादी. घटकांच्या माहितीमूळे नागरिकांच्या मनामध्ये सामाजिक कर्तव्य भावना निर्माण होते.

## नागरी संरक्षण संघटनेचे महत्त्व

१) अतिवृष्टी, महापूर, चक्रीवादळे यांमुळे निर्माण होणाऱ्या संकटांत वेळीच मदत करून परिस्थिती आटोक्यात आणता येते.

२) आपत्ती व्यवस्थापन केंद्राकडून राज्यात प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबवले जातात. नैसर्गिक आपत्ती ओढवल्यानंतर या आपत्तीचे निवारण कसे करावे, तिची तीव्रता कशी कमी करावी याबाबत या केंद्रामधून कार्यक्रम राबवून माहिती देण्यात येते.

३) पोलीस दल, गृहरक्षक दल, अग्निशमन दल हे नागरी संरक्षण दलांतील गटांना घेऊन शोध व बचाव पथकाचे कार्य करतात. पडलेल्या इमारतींच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध घेणे, त्यांना प्रथमोपचार व इतर वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे, इमारतीत अडकलेल्यांना दोरीच्या साहाय्याने वाचवणे, पुराच्या वेळी लाईफ बोट, दोरी यांच्या साहाय्याने बचाव करणे इत्यादीसाठी मास्टर ट्रेनर म्हणून प्रशिक्षण देण्यात येते.

- वादळी पावसाच्यावेळी सावधानतेबरोबरच काय करावे, काय करू नये याबाबत वृत्तपत्रे, रेडिओ, टी.व्ही. या साधनांद्वारे शासन सूचना देत असते. मात्र संकटांची माहिती संबंधित बचाव यंत्रणेतील नागरिकच त्वरित देऊ शकतात.

पुराच्या वेळी लाईफ जॅकेटस्, रिंग्ज, रबरी बोट इ. साधनांसह शोध व सुटका गट, प्रथमोपचार गट, निवारा गटातील कुशल मनुष्यबळ त्यांच्या अत्यावश्यक साधन सामग्रीबरोबर जलदगतीने कार्यरत होऊ शकते.

सार्वजनिक आरोग्य केंद्रामध्ये बचाव पथकाने तातडीने औषधे, रक्तपुरवठा, रुग्णवाहिका पुरवल्यास हजारो प्राण वाचू शकतात. आग, दंगल, जाळपोळ इत्यादी. घटनांच्यावेळी खाजगी/सार्वजनिक राष्ट्रीय संपत्तीचे संरक्षण करणे नागरी संरक्षण संस्थेमुळे शक्य होते.

दरवर्षी भेडसावणाऱ्या आपत्तीच्या निवारणासाठी शासन सज्ज राहते.





**नागरी संरक्षणात तंत्रज्ञानाचा वापर यावर चर्चा करा.**

- लोकांना आपत्तीविषयी जागरूक करण्यासाठी टी.व्ही व सोशल मीडियाचा वापर.
- एफ. एम. रेडिओद्वारे वाहतुकीच्या कोंडीची माहिती लोकांपर्यंत पोहोचेल याची व्यवस्था.

## चला शिकूया (प्रात्यक्षिक)

१) एका व्यक्तीने वाहून नेण्याच्या पद्धती जसे की पाठीवरून वाहून नेणे/ मानवी कुबडी पद्धती/फायरमन लिफ्ट पद्धत यांचा सराव करावा.

२) दोन व्यक्तींनी वाहून नेण्याच्या पद्धती

अ. दोन हातांची बैठक,

ब. तीन हातांची बैठक

क. मागे पुढे या पद्धतींचा सराव करावा.

## मूल्यमापन

| निकष | उत्तम (खूप चांगले) | योग्य (समाधानकारक) | अयोग्य (असमाधानकारक) | गुण |
|---|---|---|---|---|
| समाजसेवा | विविध संकटांच्या वेळी मदत कार्यात हिरिरीने सहभाग घेतला. उदा रस्ता अपघात, आग, महापूर अशा आपत्तीत पुढे येऊन मदत केली. | मदत कार्यात इतरांना मदत केली. | प्रसंगाकडे दुर्लक्ष केले. | |
| शालेय अपघात (क्रीडांगण, जिना इत्यादी) | क्रीडांगणावर खेळताना, जिन्यावरून जाताना होणाऱ्या अपघातात जखमीला प्रथमोपचार केले व दवाखान्यात पोहोचवण्यात पुढाकार घेतला. | प्रथमोपचार करून जखमी विद्यार्थ्यास मदत केली. | जखमीला पाहून मदत न करता निघून गेला. | |

***

## माझा अभ्यास

१. आपल्या परिसरात कोणकोणत्या नैसर्गिक आपत्ती येतात याची यादी करा. त्या निवारण्यासाठी तुम्हांस कोणकोणत्या उपाय योजना करता येतील याविषयी वर्गात चर्चा करून मुद्दे लिहा.

२. मानवनिर्मित आपत्तीमुळे कोणते नुकसान होते? अशा आपत्तींपासून बचाव करण्यासाठी तुम्हांस कोणते उपाय करता येतील ते थोडक्यात लिहा.

३. ‘साठेबाजी’ ही संकल्पना विशद करा.

४. माळीण दुर्घटनेची माहिती मिळवून लिहा.